Exh.No. 31

नेवासा येथील मे.सिव्हिल जज्ज साहेब ज्यु.डि.

रे.मु.न.२१८/२०२० यांचे कोर्टात

वादी

कडुबाई हिरालाल भाकरे तर्फे
ज.मु.शरद हिरालाल भाकरे

प्रतिवादी

इंदुबाई मोतीलाल भाकरे

याकामी प्रतिवादी तर्फे वादीने दिलेल्या नि.न.२६ चे अर्जावर म्हणणे असे ते खालील प्रमाणे.

Order
Read & Recorded.
PRANITA RITESH SUGAONKAR Digitally signed by PRANITA RITESH SUGAONKAR Date: 2026.01.30 04:34:14 +0530
Jt.CJJD

१. वादीचा निशानी नं २९ चा अर्ज व त्यातील सर्व मजकुर खोटा लबाडीचा असुन तो या प्रतिवादीस मान्य नाही कबुल नाही.

२. वादीने नि.२६ चे अर्जात अनेक खोटी व असत्य विधाने केलेली असुन प्रस्तुतचा अर्ज टेनेबल नाही तो रद्द होण्यास पात्र आहे.

३. नि.२६ चे अर्जा मध्ये खात्रीशिर पणे व कायदेशीर पणे असलेले रिसीव्हर नेमणुकीचे कारण नमुद नसल्यामुळे अश्या प्रकारचा अर्ज कायदयाने चालु शकत नसल्यामुळे कोर्ट रिसीव्हरची नेमणुक कायदया प्रमाणे मे कोर्टास देता येत नाही.

४. वादीचे निशानी नं २६ चे अर्जातील मजकुर की " सदरचा मनाई हुकुमाचा वादीचा अर्ज न्यायालयाने मंजुर केल्यानंतर प्रतिवादी ही जाणुन बुजुन वादीच्या मेहनत मशागतीस हरकत अडथळे करीत असल्याने सदरचे दावा मिळकती मधील पिकाचे नुकसान करीत असल्याने व सदरचे पिक हे चोरुन नेल्याची तयारी असल्याने त्याबाबत इतरत्र चर्चा प्रतिवादी ही करीत असल्यामुळे वादीचे मोठे नुकसान

होणार आहे.मोठा खर्च वाय जाणार आहे.वादी याने यापुर्वी देखील २०२४-२५ मध्ये सदर दावा मिळकती मध्ये प्रधानमंत्री फसल बिमा योजनेचा लाभ घेतलेला आहे.तसेच दावा मिळकत मेहनत मशागत करतांना वेळोवेळी ट्रॅक्टरच्या मेहनतीचे मशागतीचे पेमेंट ट्रॅक्टर मालक यास अदा केलेल आहे.त्याच बरोबर वादी यानी प्रतिवादी हिच्या हरकत अडथळे करुन परस्पर पिक काढुन नेण्याची धमकी दिल्या बाबत दि.२०/११/२०२५ रोजी पोलीस निरिक्षक साहेब सोनई पोलीस स्अेशन यांच्या कडे पोलीस बंदोबस्तासाठी अर्ज केलेला होता.त्यामुळे प्रतिवादी हे वादी यांचे मेहनत मशागत करुन आणलेले गव्हु व हरभरा पिक सद्यस्थितीत नंगट व गुंड प्रवृत्तीचे लोंकाचे मदतीने परस्पर काढुन नेण्याचे तयारी असल्यामुळे वादीचे कधीही न भरुन येणारे असे नुकसान होणार आहे.त्यामुळे वादी या मे कोर्टा मध्ये सदरचा कोर्ट रिसीव्हर नेमणुकीचा अर्ज देत आहे.सदरच्या कोर्ट रिसीव्हरच्या माध्यमातुन वरील दावा मिळकती मधुन असणारे हरभरा व गव्हु पिकाचे सोंगणी करुन व त्याची मार्केट व्हॅल्यु प्रमाणे विक्री करुन सदरची रक्कम मे कोर्टात जमा करणे आवश्यक आहे." इत्यादी मजकुर मोघम व काल्पनीक आहे तो या प्रतिवादीस मान्य नाही कबुल नाही.

५. निशानी नं २६ चे अर्जातील मजकुर की " याप्रमाणे वर वर्णन केल्या प्रमाणे प्रतिवादी हे दाव्याच्या जमीनीतील गव्हु व हरबरा पिकाची हेळसांडे करीत आहे आणि दाव्याच्या जमीनीला इंज्युरी पोहचवत आहेत आणि या प्रमाणे सदर दाव्याची मिळकत ही इनमिडीओ झालेली आहे.त्यामुळे प्राप्त परिस्थिती मध्ये दाव्याच्या जमीनीतील हरभरा व गव्हु पिकांची सोंगणी व त्याचे विक्रीसाठी कोर्ट रिसीव्हरची नेमणुक करणे जस्ट ॲन्ड कन्व्हीन्टं झालेले आहे.दाव्याचे जमीनीतील आलेले हरभरा व गव्हु पिक व त्याचे मे कोर्टात जमा करुन ठेवल्यास सर्व सबंधीताचे म्हणजे वादी आणि प्रतिवादी यांचे असणारे सर्व हक्क

अधिकार अबाधितच रहातील.तसेच दाव्यातील पिकाचे नुकसान होणार नाही,हेळसांडे होणार नाही आणि त्यामुळे रिसीव्हर नेमणुकीचा हुकुम करणे न्यायास,कायदयास आणि इक्वीटीस धरुनच होईल आणि त्याची प्राप्त परिस्थिती मध्ये निंतात आवश्यकता निर्माण झालेली आहे." इत्यादी कथने व मजकुर खोटा लबाडीचा असुन तो या प्रतिवादीस मान्य नाही कबुल नाही.

६. नि.न.२६ चे अर्जातील कथन की " याप्रमाणे दाव्याचे जमीनीचे मॅनेजमेंट,प्रोटेक्शन रियलायझेशन,प्रिझर्व्हेशन आणि इंप्रुव्हमेंट होण्यासाठी आणि दाव्याचे जमीतील पिकाची सोंगणी त्याची मार्केट रेट प्रमाणे विक्री करुन ती रक्कम कोर्ट रिसीव्हर मार्फत मे कोर्टात जमा करणे अत्यंत जरुरीचे झालेले आहे." हा मजकुर खोटा असुन पुरावा निर्माण करण्या साठी सदर अर्जात लिहीला आहे तो या प्रतिवादीस मान्य नाही कबुल नाही.

७. निशानी नं २६ चे कलम ५ मधील विनंती ही कायदेशीर नाही अश्या प्रकारची विनंती वादीस या स्टेजला करता येत नसल्याने वादीचा नि.२६ .मधील विनंती व अर्ज रद्द करण्यात यावा.

८. वास्तवीक पहाता वादीने दावा दाखल करतांना मौजे अंमळनेर येथील गट नंबर १८९/२/अ क्षेत्र १ हे ६३ आर पैकी ८२ आर नमुद केलेले आहे.सदर गट नंबर १८९ या संपूर्ण क्षेत्राची चतु:सिमा दाव्यात नमुद केलेली आहे.मात्र वादीने जाणीव पुर्वक व हेतु पुरस्कर रित्या ८२ आर क्षेत्राची चतु:सिमा दिली नसल्यामुळे दावा मिळकत ही आयन्डेटीफाय होत नाही तसेच ८२ आर मधील पिकाची कोर्ट रिसीव्हर यांना पाहणी करतांना अडचणी होणार आहे.

९. वादीने नि.२६ चे अर्जा सोबत गट नंबर १८९/२/अ या मिळकतीचा दिनांक २६/११/२०२५ रोजीचा उतारा दाखल केला आहे.सदर उतारा

याची मे कोर्टाने अवलोकन केल्यास पिकाचे नोंदी ठिकाणी गव्हु अथवा हरभरा या पिकाची नोंद असल्या बाबत कोठेही आढळुन येत नाही.

१०. प्रतिवादीने गट नंबर १८९/२/अ मधील ८२ आर क्षेत्रा मध्ये मोठा खर्च करुन गव्हु व हरभरा पिक केलेले आहे सदर पिकासाठी पाणी शिवाजी सिताराम आयनर यांचे मालकीचे बोअरवेलचे पाणी घेऊन सदर पिकास दिलेले आहे.वादी अर्जात म्हणतो की सदर गव्हु व हरभरा पिकाची सोंगणी होऊन त्याची विक्री होणे व विक्रीची रक्कम मे कोर्टात जमा होणे गरजेचे आहे हे म्हणणे हास्यास्पद आहे.कारण प्रतिवादीने केलेले गव्हु व हरबरा पिक हे अदयाप पावेतो लहान असुन ते सोंगणीस येण्या करीता २ते३ महिने लागणार आहे.केवळ नि.५ च्या आदेशा अन्वये वादी हा सदर प्रतिवादीचे ताब्यात असलेल्या ८२ आर क्षेत्रावर ताबा मिळवण्याचा प्रयत्न करत आहे व त्यातील पिक हे मे कोर्टाचा आधार घेऊन सदरचे पिकाची विल्हेवाट लावण्याचा वादीचा प्रयत्न आहे.वादीचे ताब्यात ८२ आर क्षेत्र नसल्याने वादी हा पोलीस खात्याचा आधार घेऊन ८२ आर क्षेत्राचा ताबा घेण्याचा प्रयत्न करत आहे.

११.वादीने कधीही गट नंबर १८९/२/अ क्षेत्र ८२ आर मध्ये गव्हु व हरबरा पिक केलेले नसल्याने व वादीचा सदर क्षेत्रावर ताबा नसल्याने वादीचा नि.२६ चा अर्ज कायदयाने चालु शकत नाही.

१२.सदर प्रतिवादीने मोठा खर्च करुन गव्हु व हरभरा पिक केले आहे ते पिक अदयाप पावेतो परिपक्व झालेले नसल्यामुळे ते खराब होण्याचा,वाया जाण्याचा व त्याची व्यवस्थापन करण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही कारण प्रतिवादी सदर पिकाची योग्य त्या पध्दतीने जोपासना करीत आहे.त्यामुळे वादीचे नि.२६ चे अर्जातील कथन हे हास्यास्पद आहे.केवळ प्रतिवादी कडुन दावा मिळकतीचा ताबा मिळण्या करीता व पुरावा निर्माण करण्या करीता वादी हे खोटे नाटे अर्ज मे कोर्टात व पोलीसा कडे देत आहे.

१३.केवळ वादी कडुन नि.५ चा आदेश झाला याचा गैरफायदा घेऊन वादी हा पोलीस खात्यास हाताशी धरुन या प्रतिवादीचे प्रत्यक्ष ताब्यातील गट नंबर १८९/२/अ मधील ८२ आर क्षेत्रास व त्यातील पिकास डिपझेस करु पहात आहे.

१४. तरी सर्व कारणांचा व परिस्थितीचा विचार होऊन वादीचा नि.२६ चा अर्ज खर्चासह रद्द करण्यात यावा.

येणे प्रमाणे प्रतिवादी कडुन नि.२६ वर म्हणणे असे

तारीख ३०/१/२०२६

प्रतिवादी तर्फे ॲड.

एस.पी.माकोणे